भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क. ४६१/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक:—३१/०७/२०१६.

**१) घरातील सामानाची चोरी. :—**

दिनांक २९+३०/०७/२०१६ रोजी रात्र दरम्यान यातील फिर्यादी मुबारक उमरअली सैय्यद वय ४४ वर्ष, रा. मोहाडी यांच्या घराचे सामोरील दाराचा कोणीतरी अज्ञात चोराने ताला तोडुन आत प्रवेश करून घरात लावलेला सॅमसंग कंपनीचा एलईडी टि.व्ही. १ कॅमेरा, मोटार सायकलची बॅटरी, चांदीचे दागीने पैजन असा एकुन ४६,०००/—रू चा माल चोरून नेला असे फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन मोहाडी येथे कलम ४५७,३८० भादंवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. गिन्हेंपुंजे पो.स्टे. मोहाडी हे करीत आहेत.

**२) विद्युत सामानाची चोरी . :—**

दिनांक २१/०७/२०१६ रोजी ००.३० ते ०५.०० वा. दरम्यान यातील फिर्यादी अतुल भैयाजी मोहनकर वय ३४ वर्ष रा. आसगाव यांची कोणीतरी अज्ञात चोराने म. रा. वी. वी. कंपनीची रोहीत्र क्र.४३८६८५२ वरील थ्रीफेस लघुदाब वाहीनीचे ७ पोल चे १.४४ किमी लांबीची ॲल्युमिनीअम तार कि.३३,९५६/—रू. चा माल मोहरी येथुन चोरून नेल्याने असे फिर्यादी यांचे लेखी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पवनी येथे कलम ३७९ भादंवि. सहकलम १३६ विद्युत अधिनीयम २००३ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोना. चुटे पो.स्टे. पवनी हे करीत आहेत.

**३) बक—यांची चोरी .:—**

दिनांक ३०/०७/२०१६ रोजी २०.०० वा. दरम्यान यातील फिर्यादी जितेंद्र वासुदेवराव सपाटे वय ३९ वर्ष रा. लाखनी यांच्या ०४ बक—या कि. २०,०००/—रू. व घराशेजारील श्रीमती शिलाबाई नागपुरे यांच्या दोन बक—या कि. १०,०००/—रू. अशा ०६ बक—या एकुन कि. ३०,०००/—रू. च्या चरण्यास सोडले असता सिंधी लाईन येथुन कोणीतरी अज्ञात चार चाकी वाहन चालकाने आपल्या वाहनात बक—या मांडुन चोरून नेला असे फिर्यादीचे लेखी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम ३७९ भादवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. उईके पो.स्टे. लाखनी हे करीत आहेत.

४) संगनमत करून परवानगीचे उल्लंघन केल्याने गुन्हा नोंद. :—

दिनांक ३०/०७/२०१६ रोजी १७.३० ते १८.३० वा. दर. यातील पाचही आरोपीतांनी सोंडयाउपसा सिंचन कालव्याचे विद्युत बिल भरण्यास व रेंगेपार पुनरवसन करण्याबाबत गैरकायदयाची मंडळी जमवुन मा. तहसिलदार तुमसर यांनी दिलेल्या परवानगीचे उल्लंघन करून येणा—या जाणा—या वाहतुकीस अडथळा निर्मान केल्याने असे सर तर्फे फिर्यादी पो. शि. मेश्राम यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन सिहोरा येथे कलम ३४१,१४३ भादंवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. चिचखेडे पो.स्टे. सिहोरा हे करीत आहेत.

३१/०७/१६

पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा करिता.

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.